शेवटी रंगभूमीचे अनेक पदर व प्रवाह प्रेक्षकांपाशी येऊन थांबतात. कारण नाटक हे शेवटी प्रेक्षकांसाठीच असते. नाटक हे वाङ्मय आणि प्रयोग यांनी मिळून बनलेली कला आहे. तिची सखोल चर्चा झाली पाहिजे. पारंपरिकता आणि आधुनिकता यांचा मिलाप झाला तर उत्कृष्ट साहित्य निमिर्ती होऊ शकते. पण हे करण्यासाठी कलेसाठी जगणा-या व कलेवर जगणा-या कलावंतांची नितांत आवश्यकता आहे. हे सर्व घडण्यास प्रेक्षकांचा, समाजाचा आणि मुख्यत्त्वेकरुन शासनाचा जास्तीत जास्त सहभाग असणे अत्यंत महत्वाचे आहे. हे करण्यासाठी माझी शासनाला एक विनंती आहे की, शासनाने नाटक हा विषय शाळा व महाविद्यालयातून किमान एक तासिका तरी ठेवावाच, ज्यामुळे सगळीच मुले जरी नट होऊ शकली नाहीत तरी सुसंस्कृत नागरिक व रसिक श्रोता आणि प्रेक्षक निश्चित होऊ शकतील. ह्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात एकेक नाट्यगृह असावे आणि ह्याच नाट्यगृहात नाट्यप्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जावी. ह्याची योजना तज्ञ व सांस्कृतिक संचालनायाशी चर्चा करुन ठरविता येईल.

जाता जाता एवढंच म्हणेन की, महाराष्ट्रभर पसरलेली हौशी रंगभूमी ही एकूणच मराठी रंगभूमीचे अंतरंग आहे. - ही रंगभूमी वृध्दिंगत व्हावी, जतन करावी, तिची जोपासना करावी आणि महाराष्ट्रभर पसरलेल्या या हौशी रंगभूमीच्या पसा-याला, शासन, प्रेक्षक आणि परिषदेने नीटपणे सावरावं, अशी अपेक्षा करतो.

ज्या हौशी रंगभूमीच्या कलावंतांसाठी नाट्यगृहे, प्रशिक्षण शिबिरे, नाट्यतंत्रज्ञांची शिबिरे, वगैरे आयोजून त्यांना अद्ययावत करायचे आहे. - पर्यायाने त्यांच्यावरही ही हौशी रंगभूमी जतन व समृध्द करण्याची जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांना अभ्यास करायचा आहे, रंगभूमीवर कलावंत म्हणून ताठपणे उभे राहण्याचा ध्यास घ्यावयाचा आहे, परिश्रम करावयाचे आहेत. मिळालेल्या भूमिकेचे अंतरंग तपासून, निरीक्षण करुन व संपूर्ण संहिता नीट वाचून - अभ्यासून आपली भूमिका नुसतीच करायची नाही, तर ठामपणे एकचित्ताने